# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १७७** **दिनांक ०३/०७/२०२१**

## <u>१४ महिन्याच्या मुलीचे अपहरण करणा-यास ६ तासामध्ये अटक करून मुलीची सुटका, नवघर पोलीस स्टेशनची कामगिरी.</u>

दिनांक ०१.०७.२०२१ रोजी फिर्यादी यांनी नवघर पोलीस स्टेशनला समक्ष येवून तक्रार दिली की, फिर्यादी यांचे पती व त्याचे साथदाराने फिर्यादी यांच्या १४ महिन्याच्या मुलीचे अपहरण करून कोठेतरी पळून गेलेले आहेत. सदर घटनेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने नवघर पोलीस स्टेशन येथे गुरनं. नं. I ४५१/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गंभीर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन सदरचा गुन्हा उघडकीस येण्याकरिता वरिष्ठांनी सुचना दिल्या होत्या. दिलेल्या सुचनांनुसार नवघर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सदर घटनेबाबत सविस्तर माहिती प्राप्त करून तपास केला असता तपासामध्ये निदर्शनास आले की, अपहृत मुलगी हिला तिचे वडील व त्याचा एक साथीदार (विधीसंघर्षीत बालक) यांनी मिळुन भाईंदर पुर्व येथुन अपहरण केल्याचे समजून आले. त्यावरुन तांत्रीक बाबींचा आधार घेवून माहिती मिळविली की, यातील आरोपी हे अपहृत मुलीस घेवून मुंबई सी. एस. एम. टी. रेल्वे स्थानक येथुन हावडा मुंबई मेलने त्यांचे मुळ गावी कांचीपुर, राज्य-पश्चिम बंगाल येथे जाणार आहे. त्याअनुशंगाने तपास पथकाने सी. एस. एम. टी. रेल्वे पोलीस, कल्याण रेल्वे पोलीस व ईगतपुरी रेल्वे पोलीस यांचेशी सातत्याने समन्वय साधून, अपहृत मुलीस तिचे वडील व त्याचा साथीदार यांना ईगतपुरी रेल्वे स्थानकावर हावडा मुंबई मेल या गाडीतुन ईगतपुरी रेल्वे पोलीस नाशिक यांचे मदतीने ताब्यात घेतले. नमुद गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन नवघर पोलीसांनी सदरचा गुन्हा अवघ्या ६ तासात उघडकीस आणुन अपहरण केलेल्या मुलीस फिर्यादी यांचे ताब्यात दिले आहे. तसेच सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. आरती गवारे, नवघर पोलीस ठाणे हया करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१ व डॉ. शशीकांत भोसले, सहा. पो. आयुक्त, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि. प्रकाश मासाळ (गुन्हे), सपोनि. भास्कर पुल्ली, योगेश काळे, पोउनि. संदिप ओहळ, पोना. १४१८ रविंद्र भालेराव, पोना. २९५६ ऐन्नोद्दीन शेख, पोशि. ५१० अनील सुर्वे, पोशि. ३४५८ संदिप जाधव यांनी केली आहे.